सत्यमेव जयते
महाराष्ट्र वनविभाग

# सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था चिचपल्ली

(स्थित-चंद्रपूर ) आकाशवाणी जवळ, बंगला नं. २८, चंद्रपूर-४४२४०१ ( महाराष्ट्र )
दूरध्वनी क्र.- ०७१७२ २७२९९९ E-mail :- directorbrtc@mahaforest.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

BRTC

**क्रमांक,कक्ष-5/प्रशिक्षण/** 98 /2023-24 **दिनांक:-** 14/06/2023

## जाहिरात

बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम 1860 (सन 1860/21) अन्वये क्रमांक महा./210/2015 नुसार दिनांक 17/07/2015 रोजी करण्यात आली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर कार्यालयाद्वारे केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत न्युक्लिअस बजेट योजना 2021-22 अन्वये मंजूर निधीतून आदिवासी युवक/युवतींना स्वयंरोजगार निर्मितीसाठी 70 दिवसाचे निवासी बांबू हस्तकला कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम देणेकरिता अनुसूचित जमातीच्या 10 प्रशिक्षनार्थ्यांची निवड करायची आहे. त्याकरिता प्रशिक्षणार्थीना 100% शासकिय अनुदानातून प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

करिता खालील निकष व पात्रता असणाऱ्या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

1) उमेदवार हा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर अंतर्गत येणाऱ्या तालुक्यातील म्हणजेच चंद्रपूर, बल्लारपूर, मूल, सावली, पोंभुर्णा, गोंडपिपरी, राजुरा, कोरपना, जिवती या तालुक्यातील रहिवासी असावा व उमेदवार अनुसूचित जमाती (S.T.) या प्रवर्गातील असावा.
2) आदिवासी युवक/युवतीं तसेच अनुसूचित जमाती अंतर्गत (S.T.) दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, विधवा, निराधार महिला यांना विशेष प्राधान्य देण्यात येईल. निवडीच्या एकूण लाभार्थ्यांमध्ये 33% जागा अनुसूचित जमातीच्या (S.T.) महिलासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या आहे. (याकरिता जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे )
3) उमेदवार हा 18 ते 38 वर्ष वयोगटातील असावा. (शासकिय नियमानुसार वयाची शिथिलता राखून ठेवण्यात येत आहे.)
4) उमेदवार हा कमीत कमी आठवी पास असावा किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षित असावा.
5) बांबू हस्तकला वस्तू तयार करण्याबाबत आवड व अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

तरी इच्छुक उमेदवारांनी दि. 15/06/2023 ते 30/06/2023 पर्यंत (रविवार व शासकिय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत आपला अर्ज, संपूर्ण वैयक्तिक तपशील व आवश्यक दस्ताऐवजाच्या छायांकित प्रतिसह खालील पत्यावर स्वत: आणून द्यावे किंवा डाकेने पाठवावे. अर्जाचा नमुना कार्यालयाचे www.brtc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच स्थानिक उमेदवारांना प्रत्यक्षरित्या या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत अर्जाचा नमुना प्राप्त करता येईल.

**अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:-**

1) या कार्यालयाचे प्रशिक्षण निवडीचे निकष व विहित कार्यपद्धतीनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवड प्रक्रियेचे अधिकार, सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था चिचपल्ली यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहेत. संस्थेने घालून दिलेल्या नियमाचे व अटीचे पालन करणे उमेदवारास बंधनकारक राहील.
2) सदर प्रशिक्षणाकरिता 10 उमेदवारांची निवड ही लेखी परीक्षा व कौशल्य चाचणी मधील प्राप्त गुणांवर अवलंबून राहील व त्यानुसार उमेदवारांची अंतिम यादी तयार करून ती या कार्यालयाचे संकेतस्थळावर वेगळ्याने प्रकाशित करण्यात येईल.
3) प्रशिक्षणाचे संपूर्ण प्रक्रीयेसंदर्भात व वेळोवेळी येणाऱ्या सूचना याबाबत सर्व अधिकार सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

टीप :- 1) प्रशिक्षणादरम्यान मोफत निवासाची व भोजनाची व्यवस्था तसेच आवश्यक गणवेश साहित्य व टूलकीट वाटप इत्यादी सुविधा लाभार्थ्यांना देण्यात येईल.
2) बांबू हस्तकला कौशल्य विकासासंबंधीचे प्रशिक्षण रोजगाराभिमुख प्रशिक्षण असून प्रशिक्षणानंतर बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र या संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारच्या नोकरीचा हक्क प्रस्थापित होत नाही.

**स्वा/-**
**सचिव**
**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र,**
**चिचपल्ली (स्थित-चंद्रपूर)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :- सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था चिचपल्ली (स्थित-चंद्रपूर)**
**यांचे कार्यालय, बंगला क्र.** 28, **आकाशवाणी केंद्रामागे, जिल्हा स्टेडियमजवळ, सिव्हील लाईन्स, चंद्रपूर** 442401,
**भ्रमणध्वनी क्र.** 9158508275, 9371773211, 9552729996

# सचिव बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था चिचपल्ली

( स्थित- चंद्रपूर)

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या निधीतून

(70 दिवसीय बांबू हस्तकला व कौशल्य विकास प्रशिक्षणाकरिता अर्ज)

BRTC

## अर्जाचा नमुना

फोटो

प्रति,

मा. सचिव,
बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र संस्था, चिचपल्ली
(स्थित- चंद्रपूर)

1. अर्जदाराचे नाव :- ____________________
2. अर्जदाराचा पूर्ण पत्ता :- ____________________
3. जन्म तारीख :- ____________________
4. प्रवर्ग :- ____________________
5. फोन/मोबाईल क्रमांक :- ____________________
6. ई-मेल आयडी (असल्यास) :- ____________________
7. शैक्षणिक अहर्ता :- ____________________
8. शिफारस संस्थेचे नाव :- ____________________

| अनु. क्र. | परीक्षेचे नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी/ग्रेड | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |
| 5. | | | | | |

8. अनुभव (असल्यास):- ____________________
____________________
____________________

वर दिलेली माहिती सत्य आहे. खोटी आढळल्यास मी कार्यवाहीस पात्र राहील. सदरचे प्रशिक्षण हे कौशल्य विकासासाठी असून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र व इतर तत्सम संस्थामध्ये नौकरीचा हक्क प्रस्थापित होत नाही याची माल जाणीव आहे व त्याचे मी पालन करेन.

दिनांक :-

(अर्जदाराची सही)

टीप :- अर्जासोबत खालील दस्ताएवजाच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

1) वयाचा दाखला (टी.सी.)
2) शैक्षणिक अहर्ता (गुणपत्रिका)
3) रहिवासी दाखला.
4) कास्ट सर्टिफिकेट.
5) पासपोर्ट साईज फोटो-2
6) आधार कार्ड.
7) बँक पासबुक.

**वरील सर्व प्रमाणपत्र स्वत: प्रमाणित करून घ्यावे.**